२) रजिस्ट्रेशन फॉर्मवर महाविद्यालयाचा सही–शिक्का आवश्यक आहे.
३) स्पर्धेसाठी नावनोंदणी करताना स्पर्धकाजवळ महाविद्यालयाचे अधिकृत ओळखपत्र असणे गरजेचे आहे.
४) स्पर्धेत सहभागी होणाऱ्या स्पर्धकाचे वय २५ वर्षापेक्षा अधिक नसावे.
५) महाराष्ट्रातील कुठल्याही विद्यापीठात पदवी व पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना या स्पर्धेत सहभागी होता येईल.
६) बाहेरगावहून येणाऱ्या स्पर्धकांना निवास व्यवस्था हवी असल्यास त्यांनी २७ ऑगस्ट २०१९ पर्यंत दूरध्वनीने वा लेखी कळविणे गरजेचे आहे (यासाठी नाममात्र शुल्क रु. ५००/– प्रत्येकी आकारले जाईल)
७) ज्या महाविद्यालयांमध्ये विविध विभाग असतील त्यांना विभागवार संघ पाठविता येणार नाही. महाविद्यालयातर्फे एक मराठी व एक इंग्रजी भाषेसाठी असे दोन संघ पाठविता येतील.
८) स्पर्धकांनी स्पर्धेत बोलत असताना आपले नाव किंवा महाविद्यालया संबंधित कुठलीही माहिती सांगू नये. नावनोंदणीच्या वेळी दिलेल्या सांकेतिक क्रमांकानेच त्यांना ओळखण्यात येईल.
९) परीक्षकांनी दिलेला निकाल अंतिम असून सर्वांवर तो बंधनकारक असेल.
१०) स्पर्धकांच्या राहण्याची, एक वेळच्या भोजनाची व अल्पोपहाराची सोय संयोजकांतर्फे करण्यात आली आहे. रात्रीच्या भोजनाची व्यवस्था स्पर्धकांनी स्वतः करायची आहे.
११) प्रत्येक स्पर्धकास सहभाग प्रमाणपत्र व गुणपत्रक देण्यात येईल.
१२) प्रवासखर्च स्पर्धकांनी स्वतः करावयाचा आहे.
१३) स्पर्धेत बोलत असताना स्पर्धकांनी टाचण वा संहिता संदर्भासाठी वापरु नये.
१४) स्पर्धेसंबंधी काही बदल करावयाचा असल्यास तो अधिकार संयोजकांनी राखून ठेवला आहे.


पत्रव्यवहारासाठी पत्ता :

**डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे,**

**श्री. नवलमल फिरोदिया विधी महाविद्यालय**

फर्ग्युसन महाविद्यालय आवार, गेट क्र.३, तुकाराम पादुका चौक, फर्ग्युसन रोड, शिवाजीनगर, पुणे – ४११ ००४.

दूरध्वनी क्र : ०२०–६७६५ ६४००, ६७६५ ६४०१

Email- dessnflcdebate2019@gmail.com


**प्रवेश अर्ज पोहचण्याची अंतिम तारीख**

२७ ऑगस्ट, २०१९

**♦ प्रवेश फी ♦**

रु. ६००/– (प्रत्येकी संघासाठी)

**♦ निवास व्यवस्था ♦**

रु. ५००/– प्रत्येकी

**♦ नावनोंदणी ♦**

३० ऑगस्ट, २०१९ रोजी सकाळी ८.०० ते ९.००
श्री. नवलमल फिरोदिया विधी महाविद्यालय, पुणे

**♦ उद्घाटन ♦**

३० ऑगस्ट, २०१९, सकाळी ९.०० ते १०.००
कुंदनमल फिरोदिया सभागृह, फिजिओथेरपी कॉलेज, फर्ग्युसन महाविद्यालय आवार, पुणे

**♦ स्पर्धेचे स्थळ ♦**

**प्राथमिक फेरी**

३० ऑगस्ट, २०१९,
श्री. नवलमल फिरोदिया विधी महाविद्यालय, पुणे

**अंतिम फेरी व पारितोषिक वितरण**

३१ ऑगस्ट, २०१९,
कुंदनमल फिरोदिया सभागृह, फिजिओथेरपी कॉलेज, फर्ग्युसन महाविद्यालय आवार, पुणे

**♦ आधिक माहितीसाठी ♦**

**शिक्षक समन्वयक**

सहा. प्रा. डॉ. प्रतापसिंह साळुंके – ०९९६०८८७४११

**विद्यार्थी समन्वयक**

| | |
|---|---|
| आदित्य मोघे (इंग्लीश) | – ९७६७१८७१३६ |
| आधित कुलकर्णी (इंग्लीश) | – ९५११८०५७४१ |
| अनुया देवकर (मराठी) | – ८८०५९७४५०० |
| सिध्दार्थ वाघमारे (मराठी) | – ८९७५५३८१६२ |

आपले नम्र

**ॲड. नितीन आपटे**
अध्यक्ष, महाविद्यालय विकास समिती
श्री. नवलमल फिरोदिया विधी महाविद्यालय

**डॉ. रोहिणी होनप**
प्राचार्य

ESTD. 1884

**डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे**

# श्री. नवलमल फिरोदिया विधी महाविद्यालय, पुणे

## (मिमांसा वादविवाद मंच)

**आयोजित**



# कै. गोपाल गणेश आगरकर स्मृती करंडक

## राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन वादविवाद स्पर्धा

**(वर्ष अकरावे)**

दिनांक ३० व ३१ ऑगस्ट, २०१९

**सप्रेम नमस्कार,**

डी. ई. एस. श्री. नवलमल फिरोदिया विधी महाविद्यालय, पुणे तर्फे कै. गोपाळ गणेश आगरकर स्मृती करंडक वादविवाद स्पर्धेचे आयोजन करीत आहोत, त्यानिमित्त हा संवाद...

## डेक्कन एज्युकेशन सोसायटी :

पारतंत्र्याच्या अंधःकारात चाचपडणाऱ्या समाजाला प्रकाशवाटांवर आणण्यासाठी १८८४ साली डेक्कन सोसायटीची स्थापना करण्यात आली. समाजमनात चेतना निर्माण करून राष्ट्राभिमुख शिक्षण देण्यासाठी लोकमान्य बाळ गंगाधर टिळक, गोपाळ गणेश आगरकर, विष्णुशास्त्री चिपुळणकर आणि माधव बल्लाळ नामजोशी या चार अध्वर्यू समाजसुधारकांनी केलेल्या अथक प्रयत्नांचं थोर प्रतीकम्हणजेच आमची संस्था! चिरंतन मानवी मूल्यांचा जागर समाजात अखंड चालू राहावा या उद्देशाने छत्रपती शाहू महाराज, वामन शिवराम आपटे यांसारख्या अनेक समाजपुरुषांनी या संस्थेच्या रुपातील ज्ञानगंगा प्रवाही राहण्यासाठी भरीव योगदान दिले. संस्थेच्या सोनेरी इतिहासाची ही सव्वाशे वर्षे म्हणजे समाजघटकाच्या उन्नतीच्या ध्येयासाठी झालेल्या वाटचालीची प्रवासगाथा आहे.

## डी. ई. एस. श्री. नवलमल फिरोदिया विधी महाविद्यालय :

सन २००४ मध्ये विधी महाविद्यालयाची स्थापना झाली. भारतासारख्या खंडप्राय आणि लोकशाहीप्रधान देशाची वैविध्यासह एकात्मता टिकण्यासाठी विधी शाखेचं महत्व अनन्यसाधारण आहे. विधी महाविद्यालयाची स्थापना करुन संस्थेने आपला सामाजिक उत्तरदायित्वाचा वसा कायम ठेवला. डी. ई. एस. श्री. नवलमल फिरोदिया विधी महाविद्यालयानेही संस्थेच्या बोधचिन्हातील गरूडाशी नातं सांगत गरूडभरारी घेतांना, अवघ्या पाचच वर्षात देशातील नामांकित अशा २५ महाविद्यालयांमध्ये १५ वे स्थान पटकाविले . ज्ञानसाधना आणि चारित्र्यसंवर्धन यांचा अनोखा मिलाफ विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वात घडविण्यासाठी डी. ई. एस्. श्री. नवलमल फिरोदिया विधी महाविद्यालय कटिबध्द आहे.

## कै. गोपाळ गणेश आगरकर स्मृती करंडक स्पर्धा :

डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या स्थापनेमध्ये कै. गोपाळ गणेश आगरकर यांचे महत्वपूर्ण योगदान आहे. क्रियाशील विचारवंत धडाडीचे पत्रकार, नामवंत प्राध्यापक, कर्तृत्ववान प्राचार्य म्हणून अनेक क्षेत्रांत त्यांचा सहज वावर असला तरी शिक्षण क्षेत्राविषयी त्यांना विशेष ओढ होती. एखादा विचार समाजाला पटवून सांगण्यासाठी आपल्या विचारांची प्रभावि मांडणी व प्रतिकूल विचारांचा तर्कशुध्द प्रतिवाद हे आगरकरांचे व्यक्ती वैशिष्ट्य होते. त्याची अभ्यास, चिंतनशील वृत्ती, प्रखर बुध्दिवाद संकटाच्या वादळातही अविचल राहणारी निर्भयता आणि मानवी मूल्यांविषयी आस्था असे अलौकिक गुणसंस्कार विद्यार्थ्यांवर व्हावे, या पवित्र उद्देशाने **मिमांसा** या नावाने वादविवाद मंचाची स्थापना केली आहे.

या स्पर्धेत आपल्या महाविद्यालयाचा संघ पाठवावा ही विनंती.

## प्राथमिक फेरीसाठी प्रस्ताव :

१) राष्ट्रीय सुरक्षिततेसाठी व्यक्तीस्वातंत्र्यावरील निर्बंध समर्थनीय आहेत./Circumscribing personal liberty to safeguard national security is a justified policy.

२) जनुकीय संशोधन (कायमेरा) हे नैतिकदृष्ट्या चुकीचे व श्रीमंतांसाठीच फायदेशीर आहे. /Experiments in genetic chimera are ethically wrong and beneficial only to the aristocrats

३) चित्रपट माध्यम परिनिरीक्षण (सेन्सॉरशिप) च्या जाचातून मुक्त करावे./Cinema should be freed from the clutches of censorship.

४) महाविद्यालय व विद्यापिठातील निवडणुकांमधील राजकीय पक्षांचा सक्रीय सहभाग समर्थनीय आहे./Active participation of political parties in college and university general elections is justified.

## अंतिम फेरीसाठी प्रस्ताव :

अनुच्छेद ३७० व ३५ अ रद्दबातल करण्यामुळे राष्ट्रीयतेला चालना मिळेल. / Repealing Articles 370 and 35A will boost nationalism.

## पारितोषिके

### ✻ सांघिक ✻

**विजेता** – कै. गोपाळ गणेश आगरकर स्मृती करंडक (फिरता)
रु. ७०००/– रोख आणि सन्मानपत्र

**उपविजेता** – कै. गोपाळ गणेश आगरकर स्मृती करंडक
रु.५०००/– रोख आणि सन्मानपत्र

### ✻ वैयक्तिक ✻

**उत्कृष्ठ वक्ता** – सन्मानचिन्ह, रु. २०००/– रोख आणि सन्मानपत्र

**उत्तेजनार्थ** – सन्मानचिन्ह रु. १०००/–आणि सन्मानपत्र

**विशेष उत्तेजनार्थ** (एकूण चार, प्राथमिक फेरीतून) –
रु. ५००/– रोख आणि सन्मानपत्र

## प्राथमिक फेरी नियम व अटी :

१) प्राथमिक फेरीसाठी असलेल्या प्रस्तावांपैकी कुठल्याही एका प्रस्तावाची निवड करुन संघातील एका स्पर्धकाने प्रस्तावाच्या अनुकूल बाजूने तर दुसऱ्या स्पर्धकाने प्रस्तावाच्या प्रतिकूल बाजूने आपले मत मांडावयाचे आहे.

२) एका संघात दोन विद्यार्थी असतील. एका महाविद्यालयातून इंग्रजी भाषेसाठी एक व मराठी भाषेसाठी एक असे एकूण दोन संघ सहभागी होवू शकतील. मराठी किंवा इंग्रजी भाषेसाठी एकच संघही सहभागी होवू शकेल पण कोणत्याही परिस्थितीत फक्त एकाच विद्यार्थ्याला सहभागी होता येणार नाही.

३) स्पर्धेत मराठी किंवा इंग्रजी भाषेतून आपले मत मांडता येईल. मात्र संघातील दोन्ही स्पर्धकांनी एकाच भाषेची निवड करावी.

४) प्राथमिक फेरीत प्रत्येक स्पर्धेकाला आपली बाजू मांडण्यासाठी व इतरांचे मुद्दे खोडण्यासाठी (५+२) = ७ मिनीटे वेळ असेल.

५) प्राथमिक फेरीचा निकाल त्याच दिवशी (दि. ३० ऑगस्ट, २०१९) प्राथमिक फेरी संपल्यानंतर जाहीर केला जाईल.

## अंतिम फेरी नियम व अटी :

१) प्राथमिक फेरीतून गुणाक्रमाने मराठी भाषेतून दोन आणि इंग्रजी भाषेतून दोन अशा एकूण चार संघाची अंतिम फेरीसाठी निवड करण्यात येईल. अंतिम फेरीमध्ये प्रत्येक संघाला २० मिनीटे वेळ दिला जाईल. त्या २० मिनीटांचे नियोजन संघातील स्पर्धकांनी करावयाचे आहे. प्रथम आपले मुद्दे मांडण्यासाठी १० मिनीटे व नंतरची १० मिनिटे इतरांचे मुद्दे खोडण्यासाठी दिली जातील. अंतिम फेरीविषयीचे अधिक तपशील प्राथमिक फेरी संपल्यानंतर दिला जाईल.

२) अंतिम फेरीमध्ये, स्पर्धकांनी त्यांची बाजू मांडल्यानंतर परिक्षक त्यांना प्रश्न विचारतील व उत्तरांना मिळालेल्या गुणांचा अतिंम निकाल तयार करतेवेळी अंतर्भाव केला जाईल.

३) अंतिम फेरीत गेलेल्या संघांनी प्रस्तावाच्या कुठल्या बाजूने बोलावयाचे आहे ते प्राथमिक फेरीच्या निकालानंतर लॉटस् (चिठ्ठी) द्वारे ठरविले जाईल. त्यामुळे स्पर्धकांना अंतिम फेरीसाठी असलेल्या प्रस्तावाच्या बाजूने व विरुध्द बाजूने तयारी करावी.

## सर्वसाधारण नियम व अटी :

१) फिरता करंडक विजेत्या संघाच्या महाविद्यालयाने स्वखर्चाने सुस्थितीत तो १ जुलै, २०२० पूर्वी संयोजकांना परत करायचा आहे.